# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# न झुकणारे पुरुष

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay; Alastair P.
रूपान्तरकार: Mary-Anne S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2026 Bible for Children, Inc.
परवाना □लाइसेंस□□□तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता□□



नबुखद्नेस्सर राजाने सोन्याची एक विशाल मुर्ति बनविली. डोक्यापासून तर पायापर्यंत ती मुर्ती सोन्याची होती. त्याचे सोनेरी राज्य कायमचे राहणार नाही हे सांगणारे स्वप्न देवाने त्याला दाखवले होते ते राजा कदाचित विसला असावा. जर पुर्णपणे सोन्याची असलेली मुर्ति बनवली, तर स्वप्नात आलेले देवाचे वचन खरे ठरणार नाही असे कदाचित त्याला वाटले असावे.



मग राजाच्या एका सेवकाने सर्व लोकांसाठी राजाचा हुकूम वाचून दाखवला, "... सुवर्णमूर्तिच्या पुढे तुम्ही साष्टांग दंडवत घालावे. जो कोणी तिला सांष्टांग दंडवत घालणार नाही त्याला तत्क्षणीच धगधगीत अग्नीच्या भट्टीत टाकण्यात येईल."



3

तिन जणांव्यतिरिक्त – राजाच्या हुकूमाप्रमाणे प्रत्येकाने केले. हि माणसे इब्री होती. ते दानिएलचे मित्र शेद्रक, मेशख, आणि अबेद्नगो होते. यावेळी दानिएल तेथे नव्हता असे दिसते, परंतू मनुष्याने बनविलेल्या मुर्ति समोर दानिएलाने देखिल सांष्टांग दंडवत घालण्यास नकार दिला असता हे निश्चित.

4

दानिएल आणि त्याचे तिन मित्र राजाचे आवडते होते म्हणून राजाचे इतर ज्ञानी लोक त्यांचा हेवा करत. म्हणून ते राजाकडे जाऊन म्हणाले, "आपण बाबेल परगण्यावर नेमिलेले शेद्रक, मेशख, अबेद्नगो या तिन पुरुषांनी, महाराज, आपला हुकूम पाळला नाही. ते आपल्या देवाची उपासना करीत नाहीत आणि आपण स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीची पूजा करीत नाहीत."



5

हे ऐकून नबुखद्नेस्सर राजा क्रोधाने संतप्त झाला. "जर तुम्ही साष्टांग दंडवत घातले नाही, तर तुम्हांला धगधगीत अग्नीच्या भट्टीत ताबडतोब टाकण्यात येईल. आणि माझ्या हातांतून तुम्हांस सोडवील असा कोणता देव आहे?" याप्रमाणे राजाने त्यांना इशारा दिला.

6

राजा फार मोठी चूक करत होता. तो जिवंत देवाला खरोखर आव्हान देत होता. एका मुर्तिची पुजा करुन तिच्यासमोर दंडवत घालणे हे देवाच्या नियमाविरुध्द् आहे हे ते इब्री तरुण जाणून होते. ते दंडवत न घालता तसेच उभे राहिले. त्यांना राजाची भिती वाटत नव्हती कारण ते परमेश्वरावर भरोसा करित होते.



7

राजाला उत्तर देण्यासाठी या तीन धाडसी पुरुषांकडे उत्तर होते. ते म्हणाले, "ज्या देवाची आम्ही उपासना करितो तो आम्हांस धगधगीत अग्नीच्या भट्टीतून सोडवावयास समर्थ आहे. महाराज, तो आम्हांस आपल्या हातांतून सोडवील. ते कसेहि असो, पण महाराज, हे आपण पक्के समजा की आम्ही आपल्या दैवतांची उपासना करणार नाही आणि आपण स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीला दंडवत घालणार नाही."



8

हे ऐकून नबुखद्नेस्सर राजा संतापला ! भट्टी जितकी तप्त होती तिच्यापेक्षा सात पटीने भट्टी अधिक तप्त करण्यास राजाने आज्ञा दिली. तरी देखिल ते पुरुष दंडवत घालणार नव्हते.



9

मग त्याने आपल्या सैन्यांतील काही बलिष्ट पुरुषांस आज्ञा केली की शेद्रक, मेशख, व अबेद्नगो यांच्या मुसक्या बांधून त्यांस त्या तप्त अग्नीच्या भट्टीत टाकावे.



10

ती भट्टी इतकी तप्त होती की ज्या पुरुषांनी शद्रक, मेशख, व अबेद्नगो यांस तिजवर नेले ते ज्वालांनी भाजून मेले.

11

राजा, लांब अंतरावरुन हे पाहात होता. धगधगीत अग्नीत तिन पुरुषांना टाकले हे राजाने पाहिले. परंतू त्याने पाहिले ते हे ऐवढेच नव्हते.

12

नबुखद्नेस्सर राजा आश्चर्यचकित झाला ! तो त्याची मदत करणाऱ्यांना म्हणाला, "आपण अग्नीत तिघां जणांस बांधून टाकिले ना?" त्यांनी राजास उत्तर दिले, "होय सरकार, हे खरे आहे." राजा म्हणाला, "पाहा ! चार इसम अग्नींत मोकळे फिरत आहेत असे मला दिसते; त्यांस कांहीएक इजा पोहचली नाही; चौथ्याचे स्वरुप तर एखाद्या देवपुत्रासारखे आहे."



13

मग नबुखद्नेस्सर त्या धगधगीत अग्नीच्या भट्टीच्या दाराजवळ येऊन मोठ्याने ओरडून म्हणाला, "अहो, शेद्रक, मेशख, व अबेद्नगो, परात्पर देवाचे सेवकहो, अग्नीतून बाहेर या." तेंव्हा शेद्रक, मेशख, व अबेद्नगो अग्नीतून बाहेर आले.



14

सर्वजण त्यांच्या अवतीभोवती गोळा झाले आणि त्यांनी या तिन्ही इब्री पुरुषांना पाहिले. त्यांना इजा करण्याचे सामर्थ्य अग्नीत नाही हे त्यांनी पाहिले. त्यांचे केस होरपळले नव्हते आणि त्यांचे कपडे देखिल जळालेले नव्हते. अग्नीचा गंधहि त्यांस लागला नव्हता.

काय घडले होते ते जेंव्हा त्याला समजले, तेंव्हा नबुखद्नेस्सर राजाने एक फार अकलेचे काम केले. त्याने प्रार्थना केली आणि म्हणाला, "ज्या देवावर शेद्रक, मेशख, व अबेद्नगो भरोसा करतात त्यांने आपला दिव्यदूत पाठवून त्यांना सोडविले आहे; त्याचा धन्यवाद असो."

न झुकणारे पुरुष

परमेश्वराची वाणी  बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल ३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०



# समाप्त



बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16